भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

दिनांक :- 23/09/25

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
भिवंडी (ठाणे)

कोटेशन नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महापालिकेच्या वाहन विभागात खालील कामाची कोटेशन दि. 30/09/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत मागविणेत येत आहेत. कामाबाबतची संपुर्ण माहिती वाहन व्यवस्थापक, वाहन विभाग यांचे कडून घेऊनच कोटेशन भरावीत मागाहुन कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करांसहित व खर्चासहित भरावीत. मागाहून कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही. कमी किंवा जास्त दराची कोटेशन नाकारणेचा आधिकार खालील सही करणार यांनी राखुन ठेवलेला आहे. उशिरा आणलेली कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारली जाणार नाहीत. तसेच कोटेशन सादर करताना सोबत पॅन क्रमांक, वस्तु व सेवा कर नोंदणी क्रमांक, संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र, व्यवसाय कर सादर करणे बंधनकारक आहे.

महानगरपालिकेचे वाहन क्र. एमएच-०४-एलक्यु-४६३३ (टाटा एलपीटी १२१६) (मॉडेल सन २०२३) या टँकर वाहनाची दुरुस्ती :-

टायर नविन फिटींग करुन मिळणे बाबत :- सदर वाहनास स्टँण्डर्ड कंपनीचे ८.२५ x २० या साईजचे ०६ नग टायर, टयुब प्लँबसह नविन फिटींग करुन दुरुस्ती करणे.

हब ग्रिसिंगची दुरुस्ती :- वाहनचालक यांच्या रिपोर्ट नुसार सदर वाहनाचे टायर डिस्क व हब चेक केले असता जास्त प्रमाणात गरम होते. तरी हब ग्रिसिंग करणे गरजेचे आहे. तरी चारही साईडचे टायर खोलुन ड्रम व एक्सल खोलुन सर्व जुने बेरिंग ऑईल सिल, ग्रीस, सरक्लीप बाहेर काढुन खराब झालेले पार्ट, बेरींग बाहेर काढुन त्याजागी स्टँडर्ड कंपनीचे बेरींग, ऑईल सिल, सरक्लिप, पॅकिंग फीट करुन योग्य प्रमाणात ग्रीस भरुन दुरुस्ती करणे.

गेअरची दुरुस्ती :- वाहन जास्त प्रमाणात रेस होत असल्याने तसेच गिअर पडत नसल्यामुळे खालील दुरुस्तीची कामे करणे आवश्यक आहे. १) जॉईटचे ०८ नग खोलून जॉईंट बाजुला करणे. २) गेअर फाऊन्डेंशनचे ०४ नग बोल्ट खोलून गेअर बॉक्स जॅकच्या साहयाने खाली उतरविणे. ३) क्लज फार्क बाजुला करुन थ्रस्ट बेरींग बाजुला करणे. ४) प्लेटचे ०८ नग बोल्ट खोलून क्लज प्लेट, प्रेशर प्लेट खाली उतरविणे. ५) फलॅायव्हीलचे ०६ नग बोल्ट खोलून फलॅायव्हील खाली उतरविणे व लेथ मशिनवर पॉलिश फेसींग करणे.

उप अभियंता (यांत्रिकी)
तथा वाहन विभाग प्रमुख
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

दिनांक 23/09/२०२५

खालील ठिकाणी प्रसिद्ध केली.

१) मनपा संकेतस्थळ